मुंबई, दि. १३ जानेवारी, २०१६

**हवामान आधारीत फळपिक विमा योजना**

**जळगाव जिल्ह्यातील १०,१६२ शेतक-यांना**

**४१ कोटी, २ लाख, ७६ हजार रुपये अदा**

मुंबई, दि. १३ जानेवारी :- सन २०११-१२ पासून हवामान आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेत द्राक्ष, केळी, संत्रा, मोसंबी, डाळिंब, पेरु, आंबा, काजू व चिकू या फळपिकांचा योजनेतंर्गत समावेश आहे, अशी माहिती आज राज्य शासना तर्फे देण्यात आली.

राज्य शासनाने असे स्पष्ट केले आहे की, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर योजना मृग व आंबिया बहारात अधिसूचित फळपिकांकरीता राबविण्यात आली आहे. सदरहू योजनेत जळगाव जिल्ह्यातील केळी फळपिकाकरीता एकूण २२५०६ शेतक-यांनी विमा हप्त्यापोटी रक्कम रु. ४१ कोटी ४५ लाख ३८ हजार, एवढी रक्कम विमा कंपनीकडे जमा केली होती.

सदर योजनेतील विमा प्रमाणकानूसार दि. १३ जानेवारी, २०१६ आज अखेर १०,१६२ शेतक-यांना एकूण रु. ३३ कोटी, ८४ लाख, ७६ हजार इतकी रक्कम विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे. सदर रक्कमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| तालुका | लाभार्थी शेतक-यांची संख्या | वितरीत केलेली दाव्याची रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| अमळगाव | १ | ०.२५ |
| अमळनेर | ९८ | २१.५९ |
| भडगाव | २४८ | ६७.१५ |
| भुसावळ | १८७ | ३८.०८ |
| चाळीसगाव | १०० | २७.६४ |
| चोपडा | १२३२ | ३१३.५० |
| धरणगाव | २४० | ७५.१० |
| एरंडोल | २५ | १०.५९ |
| जळगाव | २७५६ | ७८३.३० |
| जामनेर | ३५ | ७.५९ |
| मुक्ताईनगर | ६१६ | २२५.११ |

| तालुका | लाभार्थी शेतक-यांची संख्या | वितरीत केलेली दाव्याची रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| पाचोरा | १३५ | ७०.२५ |
| रावेर | २५२४ | ८४७.५६ |
| यावल | १९६५ | ८९७.०५ |
| एकूण | १०१६२ | ३३८४.७६ |

तर, उर्वरित ७ कोटी, १८ लाख, रुपये आज दि. १३ जानेवारी, २०१६ रोजी संबंधित विमा कंपनीमार्फत जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जमा करण्याकरिता वितरीत करण्यात आले आहे. सदर रक्कम पुढ़ील दोन दिवसात संबंधित शेतक-यांना अदा करण्यात येईल. असे विमा कंपनीने कळविले आहे.

**सन २०१४-१५ एकूण अंतिम रक्कम रु. ४५ कोटी पैकी रु ४१ कोटी, २ लाख, ७६ हजार एवढी रक्कम वितरीत करण्यात आली आहे**. केवळ रु. ४ कोटीचे दावे अंतिमत: मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये काही तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित असल्याकारणाने सदर रक्कम संबंधित बँकेला वितरीत करणे प्रलंबित असल्याचे कळविले आहे. सदर सर्व दाव्याचा निपटारा पुढील ७ दिवसांमध्ये पूर्ण करुन लगेच रक्कम वितरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्याचे विमा कंपनीने कळविले असल्याचे राज्य शासनाने म्हटले आहे.

------*------